# मुंबई विद्यापीठ

**निवडणूक विभाग**

## परिपत्रक

क्र.नि.वि./आयसीडी/२०२३-२४/**२४२**.

मुंबई विद्यापीठाच्या अधिसभा व विद्यापरिषदेवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील विविध कलमांतर्गत महाविद्यालयीन अध्यापक व विद्यापीठ अध्यापक यांच्या निवडणूका बुधवार, दिनांक ०५ जुलै, २०२३ रोजी विद्यापीठाने विहीत केलेल्या मतदान केंद्रांवर होणार आहेत.

याअनुषंगाने कळविण्यात येते की, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि पालघर या जिल्ह्यांतील महाविद्यालयांमधील जे अध्यापक मतदार असतील आणि ज्यांना मतदान करावयाचे असेल अशा सर्व अध्यापकांना बुधवार दिनांक ०५ जुलै, २०२३ रोजी मतदान करण्याकरीता **"विशेष रजा"** देण्यात येत आहे.

मुंबई व ठाणे जिल्ह्यांतील सर्व संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्य व संचालकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी अध्यापकांना त्यांना मतदान करण्याकरीता आपल्या स्तरावर परवानगी देण्यात यावी. तसेच मतदान करू इच्छिणारे अध्यापक मतदानापासून वंचित राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

स्वाक्षरीत/-

दिनांक : ०४ जुलै, २०२३
ठिकाण : मुंबई - ४०० ०३२.

(प्रा. सुनिल भिरूड)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी